**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**
कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी २,बांन्द्रा कुर्ला संकुल,
बांन्द्रा (पुर्व), मुंबई ४०० ०५१
**संकेतस्थळ** – www.mahabocw.in
**दुरध्वनी व फॅक्स क्र.** ०२२-२६५७२६३१ **ई-मेल**-bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र.मइवइबांकाकम/प्रतीनियुक्ती/२०१८/5260 दिनांक: 26 DEC 2018

प्रति,
मा. संचालक,
लेखा व कोषागारे संचालनालय,
तिसरा मजला, ठाकरसी हाऊस,
फॉरीन पोस्ट ऑफिस जवळ,
फोर्ट मुंबई-१

**विषय:** मंडळाचे मुख्यालय आणि जिल्हास्तरावर गट अ आणि गट ब संवर्गातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

उपरोक्त विषयासंदर्भात उद्योग ऊर्जा व कामगार विभागाची सविस्तर जाहिरात www.Maharashtra.gov.in आणि मंडळाच्या www.mahabocw.in हया दोन्ही संकेत स्थळांवर दि.१६.११.२०१८ रोजी प्रकाशित झाली आहे. तसेच लोकमत दैनिकाच्या सर्व जिल्हा आवृत्यामध्ये दि.१९.११.२०१८ रोजी मंडळाची संक्षिप्त जाहिरात प्रकाशित झाली आहे.( प्रत सोबत जोडली आहे) प्रथमत: सदर पदांसाठी अर्ज करण्याची मुदत दि.०२ डिसेंबर २०१८ पर्यंत होती परंतू , यास शासनाने त्यांचे पत्र क्र. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.इबांका२०१८/प्र.क्र.१३५/काम-७ दि.२०.१२.२०१८ नुसार दि.५ जानेवारी २०१९ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की लेखा व कोषागारे संचालनालयातील गट अ आणि गट ब संवर्गातील अधिकाऱ्यांना उपरोक्त पदासाठी अर्ज करण्याकरिता अवगत करण्यात यावे. त्यांचे अर्ज वित्त विभागामार्फत उद्योग ऊर्जा व कामगार विभागास दि.५ जानेवारी २०१९ पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तरी सहकार्य करावे ही विनंती.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

मूळ जाहिरात मागवून घ्यावी व [illegible] वर टाकावी 26/12

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**
**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी २०,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, बान्द्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१**
**दूरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२६५७२६३१**
**ईमेल :** bocwwboardmaha@gmail.com । **संकेतस्थळ** : www.mahabocw.in

जा.क्र.: मइवइबाकाकमं/प्रतिनियुक्ती/२०१८

**मंडळाचे मुख्यालय आणि जिल्हास्तरावर गट-अ आणि गट-ब संवर्गातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयात जिल्हा कार्यकारी अधिकारी (गट-अ)(वेतनश्रेणी-१५६००-३९१००+५४००) -०१ पद आणि मुख्यालय तसेच जिल्हास्तरावर उप कार्यकारी अधिकारी (गट-ब) (वेतनश्रेणी-९३००-३४८००+४४००) - २० पदे प्रतिनियुक्तीने प्रथम २ वर्षे कालावधीसाठी भरावयाची आहेत. या संदर्भातील सविस्तर जाहिरात, अर्हता, शासनाचे विवक्षीत विभाग ज्यातील गट-अ/गट-ब संवर्गातील अधिकारी अर्ज करु शकतील, पदांचा जिल्हानिहाय तपशील व अर्जाचा नमुना या सर्व बाबी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आणि मंडळाच्या www.mahabocw.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जाहिरातीत उल्लेखलेल्या व महाराष्ट्र शासनाच्या विवक्षीत विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या गट-अ/गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांनी संबंधित विभागामार्फत कामगार विभागास ०२/१२/२०१८ या दिनांकापर्यंत अर्ज करावयाचे आहेत. सदर अर्जाची एक आगाऊ प्रत मंडळ कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/-

(श्री. चु. श्रीरंगम्)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ. मंबई.

## महाराष्ट्र शासन

क्र. इबांका २०१८/प्र.क्र.१३५/काम-७
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २०१८

प्रति,

सह/उप सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

**विषय** :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिल्हा कार्यकारी अधिकारी, (१ पद) आणि उप कार्यकारी अधिकारी (२० पदे) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.
सह सचिव/उप सचिव यांचेकडून इच्छुकता मागणी.

**संदर्भ** :- सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे क्र.मइवइबाकमं/४९३१/२०१८, दिनांक १७.१०.२०१८ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

संदर्भिय पत्रान्वये, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ नुसार त्यांच्या मुख्यालयासह विविध जिल्हा कार्यालयांकरिता जिल्हा कार्यकारी अधिकारी (गट-अ), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ (१ पद) आणि उप कार्यकारी अधिकारी (गट-ब), महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ (२० पदे) प्रतिनियुक्तीने तात्काळ भरण्याची विनंती केली आहे.

२. त्यानुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती, आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार वरील पदांवर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील सर्व गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांना सदर प्रतिनियुक्तीबाबत अवगत करावे. सदर पदे ०२ वर्ष कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर भरावयाची आहेत. तसेच, इच्छुक गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांचे मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल (छायांकित प्रती) व पत्रासोबत जोडलेल्या

प्रपत्र-ब मधील वैयक्तिक माहिती या विभागाकडे तात्काळ पाठवावी. तसेच इच्छुक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. सदर संबंधित अधिकाऱ्याच्या नियत सेवानिवृत्तीस किमान ४ वर्षे बाकी असतील अशाच अधिकाऱ्यांनी इच्छुकता प्रस्ताव पाठवावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छुक नसल्यास "निरंक" असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नांव मागे घेता येणार नाही.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. हे ५त्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे

प्रत :- १. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
२. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य , मुंबई.
३. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म. इ. व इ. बां. का. कल्याणकारी मंडळ, मुंबई.
४ निवडनस्ती (कामगार-७)

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.इमारत २०१२/प्र.क्र.१६१/काम-७अ, दिनांक ३.१०.२०१२ अन्वये मुख्यालय व जिल्हानिहाय मंजूर सहायक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांच्या मंजूर ठिकाणाऐवजी मंडळाकडील जिल्हानिहाय नोंदणीस अनुसरुन प्रतिनियुक्तीने भरावयाच्या ठिकाणाचा तपशील दर्शविणारे प्रपत्र

**" प्रपत्र - अ "**

| अ.क्र. | ठिकाण | जिल्हा कार्यकारी अधिकारी, म.इ. व इ.बां.का.क मंडळ | उप कार्यकारी अधिकारी, म.इ. व इ.बां.का.क मंडळ |
|---|---|---|---|
| १ | मुख्यालय | ०१ | ०१ |
| | **एकूण मुख्यालय** | ०१ | ०१ |
| | **कोकण विभाग** | | |
| १ | ठाणे | - | ०१ |
| २ | रायगड | - | ०१ |
| ३ | रत्नागिरी | - | ०१ |
| | **एकूण कोकण विभाग** | - | ०३ |
| | **पुणे विभाग** | | |
| १ | पुणे | - | ०१ |
| २ | सांगली | - | ०१ |
| ३ | सातारा | - | ०१ |
| ४ | कोल्हापूर | - | ०१ |
| ५ | सोलापूर | - | ०१ |
| | **एकूण पुणे विभाग** | - | ०५ |
| | **नाशिक विभाग** | | |
| १ | अहमदनगर | - | ०१ |
| २ | धुळे/नंदुरबार | - | ०१ |
| | **एकूण नाशिक विभाग** | - | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| औरंगाबाद विभाग | | | |
| १ | लातूर | - | ०१ |
| २ | जालना | - | ०१ |
| ३ | बीड | - | ०१ |
| ४ | उस्मानाबाद | - | ०१ |
| | एकूण औरंगाबाद विभाग | - | ०४ |
| अमरावती विभाग | | | |
| १ | यवतमाळ | - | ०१ |
| २ | बुलढाणा | - | ०१ |
| | एकूण अमरावती विभाग | - | ०२ |
| नागपूर विभाग | | | |
| १ | नागपूर | - | ०१ |
| २ | गोंदिया | - | ०१ |
| ३ | चंद्रपूर | - | ०१ |
| | एकूण नागपूर विभाग | - | ०३ |
| मुख्यालय व सर्व विभागाची एकत्रित एकूण पदे | | ०१ | २० |

<u>जाहिरातीसाठीचे प्रारुप</u>

**उद्योग,उर्जा व कामगार विभाग**

पत्र क्रमांक: इबांका २०१८/प्र.क्र. १३५ / कमगार ७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १६ नोव्हेंबर, २०१८.

दूरध्वनी व फॅक्स क्र. ०२२-२२०२६३३० ई-मेल- shashank.sathe@nic.in
or dattatray.dange@nic.in

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मुख्यालय आणि जिल्हास्तरावर गट-अ आणि गट-ब संवर्गातील पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयात जिल्हा कार्यकारी अधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी-१५६००-३९१००+५४००) - ०१ पद आणि मुख्यालय तसेच जिल्हास्तरावर उपकार्यकारी अधिकारी (गट-ब) (वेतनश्रेणी ९३००-३४८००+४४००)- २० पदे प्रतिनियुक्तीने प्रथम २ वर्षे कालावधीसाठी भरावयाची आहेत. या संदर्भातील सविस्तर जाहिरात, अर्हता, शासनाचे विवक्षीत विभाग ज्यातील गट-अ/गट-ब संवर्गातील अधिकारी अर्ज करु शकतील, पदांचा जिल्हा निहाय तपशिल व अर्जाचा नमुना या सर्व बाबी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in **या संकेत स्थळावर** आणि मंडळाच्या mahabocw.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. जाहिरातीत उल्लेखिलेल्या व महाराष्ट्र शासनाच्या विवक्षीत विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या गट-अ/गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांनी संबंधित विभागामार्फत कामगार विभागास ०२ डिसेंबर २०१८ या दिनांका पर्यंत अर्ज करावयाचे आहेत. सदर अर्जाची एक आगाऊ प्रत मंडळ कार्यालयास सादर करावी.

(श. मा. साठे)
उप सचिव महाराष्ट्र शासन

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th colspan="2">तपशिल/अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>२</td><td>जन्मदिनांक</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>३</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>४</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>५</td><td>मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>६</td><td>मत्ता व दायित्वे सादर केली आहेत का?</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>७</td><td>५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का ? (लागू असल्यास)</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="4">८</td><td rowspan="4">संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद व कालावधी) (प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी १० वर्षापेक्षा जास्त नसावा)</td><td>दिनांकापासून ते दिनांकापर्यंत</td><td>पद/प्रतिनियुक्तीचे ठिकाण</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="2">एकूण कालावधी</td></tr>
<tr><td>९</td><td>मागील प्रतिनियुक्तीवरुन परत आल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे पूर्ण झाली आहेत का ?</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>१०</td><td>संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे काय ?</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>११</td><td>प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे.</td><td colspan="2"></td></tr>
</table>